॥ आजचा सुविचार ॥

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०६ | अंक : ५४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०७ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# विद्यार्थ्यांना मारहाण अन् नोटिसा !!

## महाराष्ट्रात योगी आदित्यनाथ बनण्याचा प्रयत्न करू नका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, छ. संभाजीनगर :** महाराष्ट्र पोलिसांची तुलना स्कॉटलंड यार्डशी केली जाते आणि आम्ही जगभरात त्यांची वाहवा करतो. असे असताना पोलिसांकडून आंदोलकांना नोटिसा पाठवून मन तोडण्याचे काम केले जात आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे म हाराष्ट्रात योगी आदित्यनाथ बनण्याचा प्रयत्न करत आहेत, पण हा महाराष्ट्र आहे हे त्यांनी विसरू नये, असा घणाघाती हल्ला अभिजीत दिपके यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी पोलिसांच्या दडपशाहीवरून राज्य सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला.

अभिजीत दीपके पत्रकार परिषदेत बोलताना पोलिसांच्या या कारवाईवर सडकून टीका केली. माझ्या सहकाऱ्यांना त्रास देऊन छळण्यापेक्षा हिंमत असेल तर पोलिसांनी मला थेट अटक करावी, असे खुले आव्हान त्यांनी दिले. चंद्रपूर पोलिसांनी आमच्या सहकाऱ्यांना नोटीस पाठवून आंदोलन हिंसक होईल असा दावा त्यांनी केला आहे. जंतरमंतरवर आंदोलन करू नका, असे पोलिसांचे म्हणणे आहे. पण जंतरमंतर चंद्रपूरमध्ये येते का? असा थेट सवाल करत पोलिसांच्या या कारवाईमागे वरिष्ठ पातळीवरून दबाव असल्याचा आरोप दीपके यांनी केला.

**आदिवासी विद्यार्थ्यांना मारहाण; पोलिसांना शोभत नाही**

नंदुरबार येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राहुल पवार आणि इतर विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचा निषेध करत दीपके म्हणाले, पोलिसांकडे राज्यातील गुन्हेगार संपले आहेत का, जे ते आदिवासी विद्यार्थ्यांवर लाठ्या



चालवत आहेत? हेच जर अंबानींचे मूल असते तर त्याच्यावर असा हल्ला करण्याची हिंमत पोलिसांनी दाखवली असती का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**काही झाल्यास संपूर्ण देशात 'जंतरमंतर' घडवू**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत त्यांनी मतदार याद्यांमधील घोळावर बोट ठेवले. १३ कोटी मते रद्द करण्यापूर्वी निवडणूक आयोगाने परवानगी घेतली होती का? असा सवाल करत त्यांनी राज्यभरात फिरताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा रोष असल्याचे स्पष्ट केले.

## दिल्ली येथील आंदोलनासाठी उद्या नवी दिल्लीत ओबीसींची महत्वाची बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** भारत सरकारने राजपत्राच्या प्रश्नावली मध्ये ओबीसी साठी स्वतंत्र्य कॉलम ची सूची नसल्याने, २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान करण्यात येणार आहे, पूर्वी आंदोलनाच्या नियोजन संदर्भात बेंगलूरु (कर्नाटक), नागपूर (महाराष्ट्र), हैदराबाद (तेलंगणा) छिंदवाडा (मध्यप्रदेश) बैठका नंतर दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ ला कॉन्स्टिट्यूशन क्लब, रफी मार्ग, नवी दिल्ली येथे दुपारी १२ ते ३ पर्यंत बैठकीचे आयोजित करण्यात आलेली आहे.

जनगणनेत ओपन एंडेड प्रश्न विचारले असुन त्याऐवजी ड्राफ्ट डाउन सूची तयार करून, २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, केंद्रात स्वतंत्र मंत्रालय स्थापित करण्यात यावे, १३ सप्टेंबर २०१७ पासून क्रिमिलीअरची मर्यादा वाढली नाही आहे, ती वाढविण्यात यावी, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान होणाऱ्या आंदोलनाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

सदरची बैठक राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष जाजुला श्रीनिवास गौड, राज्य मागासवर्गीय आयोगाने माजी सदस्य तथा ऑल इंडिया मुस्लिम ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष इक्बाल अन्सारी आणि खासदार, आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी आणि ओबीसी संघटनाचे अध्यक्ष, सर्व जात संघटनाचे पदाधिकारी महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहणार आहेत असे राष्ट्रीय ओबीस म हासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी कळविले आहे.

## कळंबोलीकर तहानलेले, टँकर मात्र 'फुल्ल'; पाणीपुरवठ्यावर प्रश्नचिन्ह!

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०६, पनवेल (नवी मुंबई) :** कळंबोली परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न गेल्या काही महिन्यांपासून कायम असताना नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. एकीकडे घरगुती वापरासाठी तसेच पिण्यासाठी पाण्याची कमतरता भासत असताना दुसरीकडे परिसरातील काही पाणीपुरवठा केंद्रांबाहेर मोठ्या संख्येने टँकर उभे राहून पाणी भरत असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या वाट्याचे पाणी नेमके कुठे जात आहे, असा सवाल उपस्थित झाला आहे.



कळंबोलीतील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक अनियमित असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारी आहेत, तर काही भागांमध्ये नागरिकांना पर्यायी व्यवस्था करावी लागत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत टँकरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाणी उचलले जात असल्याचे दृश्य समोर आल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

टँकरसाठी पाणी उपलब्ध, मग नागरिकांसाठी टंचाई का? असा थेट प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. पाणीपुरवठा केंद्रांवरून टँकरमध्ये पाणी भरण्याची अधिकृत व्यवस्था आहे का, संबंधित टँकरना कोणत्या कारणासाठी पाणी दिले जाते, त्यासाठी कोणाची परवानगी घेतली जाते आणि त्याची नोंद ठेवली जाते का, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती देण्याची मागणी होत आहे.

विशेष म्हणजे, पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर प्रशासनाचे नियंत्रण असणे अपेक्षित आहे. टँकरना दिले जाणारे पाणी, त्यांचे नियोजित मार्ग, लाभार्थी तसेच पाण्याचे प्रमाण याबाबत पारदर्शकता असणे गरजेचे आहे. मात्र, नागरिकांना नियमित पाणी मिळत नसताना मोठ्या प्रमाणावर टँकर पाणी भरताना दिसत असतील, तर या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, काही ठिकाणी राजकीय किंवा प्रभावशाली व्यक्तींच्या माध्यमातून टँकरसाठी पाणी उपलब्ध करून दिले जात असल्याच्या चर्चाही नागरिकांमध्ये सुरू आहेत. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करून टँकरद्वारे पाणीपुरवठा कोणत्या नियमांनुसार केला जातो, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कळंबोलीकरांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी पुरेसे आणि नियमित पाणी मिळणे हा मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे नागरिकांच्या पाणीप्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन टँकरला होणारा पाणीपुरवठा, त्यामागील परवानगी आणि संपूर्ण वितरण व्यवस्था याची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. नागरिक तहानलेले असताना टँकर मात्र 'फुल्ल' कसे, याचे उत्तर प्रशासन कधी देणार? हा प्रश्न सध्या कळंबोलीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

## तळोजा एमआयडीसीत स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगाराचा मुद्दा ऐरणीवर ; महापौर नितीन पाटील यांचा पुढाकार




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०६, पनवेल (नवी मुंबई) :** तळोजा औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमध्ये स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर तळोजा एमआयडीसीतील विविध कंपन्यांच्या प्रशासनासोबत महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

तळोजा एमआयडीसीमध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक आणि व्यावसायिक आस्थापना कार्यरत आहेत. या उद्योगांमुळे परिसरात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत असल्या, तरी स्थानिक युवकांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे कंपन्यांमधील उपलब्ध रोजगाराच्या संधींमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना योग्य प्राधान्य मिळावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

स्थानिक युवकांकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि कौशल्ये असतानाही रोजगारासाठी त्यांना इतर भागांमध्ये संधी शोधावी लागते. त्यामुळे कंपन्यांनी स्थानिक पातळीवर रोजगार मेळावे, कौशल्य प्रशिक्षण आणि भरती प्रक्रिया राबवून स्थानिक तरुणांना संधी उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

उडठ निधीचा स्थानिक विकासासाठी वापर करण्याची मागणी रोजगाराबरोबरच तळोजा परिसरातील सामाजिक विकासाचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. औद्योगिक कंपन्यांकडून सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून (CSR) विविध उपक्रम राबविले जातात. या निधीचा काही भाग तळोजा परिसरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि विकासकामांसाठी वापरण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

स्थानिक शाळांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम राबविणे, आरोग्य तपासणी शिबिरे घेणे तसेच परिसरातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी कंपन्यांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. उद्योग आणि स्थानिक प्रशासनामध्ये समन्वयाची गरज तळोजा एमआयडीसीचा विकास होत असताना त्याचा लाभ स्थानिक नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले. उद्योगांच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी, उडठ उपक्रम आणि स्थानिक विकासकामे यामध्ये अधिक समन्वय निर्माण करण्यासाठी पुढील काळातही कंपन्यांच्या प्रशासनासोबत पाठपुरावा केला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

स्थानिक युवकांना रोजगार, परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा आणि औद्योगिक क्षेत्राला आवश्यक मनुष्यबळ या तिन्ही बाबींचा समतोल साधण्यासाठी उद्योग प्रशासन आणि स्थानिक प्रतिनिधींमध्ये सातत्याने संवाद राहणे गरजेचे आहे. या दृष्टीने महापौर नितीन पाटील यांच्या पुढाकारामुळे स्थानिक रोजगार आणि परिसर विकासाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि तळोजा परिसराच्या विकासात उद्योगांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी पुढील काळातही संबंधित कंपन्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## घाटकोपरमध्ये धक्कादायक प्रकार; विद्यार्थ्यावर चाकूने धाक दाखवत हल्ला

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०६, घाटकोपर :** घाटकोपर (प) - स.गो. बर्वे नगर कॉलनी येथे सोमवार दि.५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या दरम्यान एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. सातवीच्या तीन नंबर महानगरपालिका शाळेतील एका विद्यार्थ्याला चार ते पाच जणांच्या टोळक्याने अडवून चाकूचा धाक दाखवला आणि मानेवर सिरींन सदृश्य वस्तूने मारण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,या घटनेनंतर सदर विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला तात्काळ मुक्ताबाई रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत.सुदैवाने आता मुलाची तब्येत धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे.

**पोलिस घटनास्थळी आलेच नाहीत – नागरिकांचा आरोप**

सर्वात खेदाची बाब म्हणजे घटना घडून बराच




वेळ उलटूनही पोलिस घटनास्थळी आले नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या प्रकाराम ुळे परिसरात संतापाचे वातावरण आहे.

या घटनेचा आम्ही सर्व घाटकोपरवासीय जाहीर निषेध करतो.लवकरात लवकर तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**३ नंबर गार्डनमधील धोकादायक प्रकार**

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ नंबर गार्डन (प्रेम गल्ली) येथे नियमितपणे अवैध कृत्ये सुरू असल्याचे सांगण्यात येते. तेथे सर्रासपणे गांजा आणि इतर अमली पदार्थांचे सेवन केले जाते. तसेच अल्पवयीन मुला-मुलींचे आक्षेपार्ह वर्तन देखील निदर्शनास येते.१०० नंबरवर कॉल करूनही पोलिसांना काहीच सापडत नसल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

निषेध मोर्चाचे आयोजन

या संपूर्ण घटनेच्या विरोधात येत्या रविवारी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी सर्व घाटकोपरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन नागरिकांतर्फे करण्यात आले आहे.

**नागरिकांची मागणी :**

१. संबंधित टोळक्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी.

२. ३ नंबर गार्डन परिसरात नियमित पोलिस गस्त वाढवावी.

३. शाळकरी मुलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात.




## कॉकपिटचे स्थैर्य व सुरक्षा

ऐन दिवाळीच्या सुट्टीत एकदा विमानतळावर सुरक्षा चाचणीत सर्वजण रांगेत असताना एक महिला अत्यंत घाईगडबडीत सुरक्षा अधिकाऱ्यांकडे लवकर जाण्यासाठी विनवणी करू लागली. 'मला अत्यंत तातडी आहे आणि माझ्या विमानाची वेळ होत आली आहे,' असा घोशा तिने लावला. अधिकाऱ्यांनी मात्र जराही विचलित न होता तिला थांबवून ठेवले आणि थोडी अधिक काटेकोरपणे तिची तपासणी केली. त्यांचा संशय खरा निघाला. सुरक्षेचा उंबरठा पार करून ही महिला काही पुढे येऊ शकली नाही.

'फ्लायदुबई'च्या थरारक घटनेत मुंबईकर कॅप्टन स्मित मच्छार यांची धाडसी कामगिरी व प्रसंगावधान; तसेच अन्य प्रवासी आणि ऑफड्युटी वैमानिकाची योग्य वेळी मदत यांमुळे सर्वांचे प्राण वाचले खरे; परंतु हवाई सुरक्षेच्या बाबतीत सर्व शक्यतांचा विचार करून सावधगिरी गरजेची ठरते. हवाई वाहतुकीतील सुरक्षाप्रणालींमध्ये आजवर झालेल्या विविध घटनांनुसार बदल घडत आले. आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना (आयकाव) या शिखर संघटनेतर्फे जागतिक स्तरावरील विमान उड्डाण सुरक्षेतील नियमांवर मोहोर उमटविली जाते. १९६०-७०च्या दशकांत विमान अपहरणांचा धोका प्रथम समोर आला. त्यानंतर १९८५मध्ये एअर इंडियाच्या टोरोन्टो-मुंबई कनिष्क विमानात अज्ञात व्यक्तीने सूटकेसमधून बॉम्ब दडवून ठेवला होता. या घातपातानंतर बॉम्बशोधक व नाशक प्रकारच्या पद्धतींवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. मेटल डिटेक्टर, एक्स-रे तपासणी अशा सामग्रीचा तपासणीत समावेश झाला. सन २००६मध्ये रसायनांचा वापर करून विमान उडवण्याचा कट आखण्यात आला होता, तो उधळून लावण्यात आला.

दिनांक ११ सप्टेंबर २००१च्या अमेरिकेवरील हल्लयानंतर तर विमानाच्या कॉकपिटचे दरवाजे अभेद्य करण्यापासून विमानात काही मार्गांवर सशस्त्र एअर मार्शल तैनात करण्यापर्यंत विविध कठोर उपाय करण्यात आले. कंदहारची काठमांडू-दिल्ली इंडियन एअरलाइन्स विमान अपहरण घटना आणि ट्वीन टॉवर हल्ले यांच्यानंतर भारतातील ७२ विमानतळांवरील सुरक्षा यंत्रणा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या (सीआयएसएफ) हाती सोपविण्यात आली. मात्र, एकूणच सुरक्षा यंत्रणांकडे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे पाहण्याचा कित्येक प्रवाशांचा दृष्टिकोन त्रासिक असतो. विमानात बॅगा ठेवण्यापासून ते मोबाइलचा उपयोग किंवा खिडक्यांची तावदाने उघडी ठेवण्याबाबतचे नियम पाळण्याविषयी कित्येक प्रवासी हलगर्जी दाखवितात. सध्याचे सुरक्षा वातावरण व भारतातील विमानवर्दळ पाहता प्रवाशांनीही सुरक्षा नियमांबाबत सहकार्याचा दृष्टिकोन बाळगायला हवा.

'फ्लायदुबई'च्या विमानातील घटनेनंतर काही नवी आव्हाने समोर आली आहेत. आजवरच्या घटनांनंतर सर्व लक्ष हे गणवेशधारी किंवा विमान कर्मचारी वगळून प्रवासी व अन्य आगंतुकांवर केंद्रित झाले होते. आता विमानाचे कॉकपिट हेच जर घातपाताचे केंद्र बनले, तर त्याला आळा कसा घालायचा, असा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. 'फ्लायदुबई' विमानातील घटनेत हल्लेखोर सहवैमानिकाने विमानातील आपत्कालीन सुटकेसाठी ठेवलेली कुऱ्हाड वापरल्याचे आता समोर येत आहे. आता प्रश्न तोच आहे, की या घटनेमुळे या कुऱ्हाडीला सोडचिठ्ठी काही देता येणार नाही. कदाचित तिची जागा बदलली, तरी ती कुणाच्याही हाती जाण्याचा धोका राहतोच. खरे तर दोन्ही वैमानिक जायबंदी झाल्यास काय करावे लागेल, याचा विचार 'आयकाव'च्या सुरक्षा नियमावलीतही केलेला असतो. त्यामुळेच एका सांकेतिक कोडने केबिन क्रूला दरवाजा उघडण्याची तरतूद केलेली असते. कॉकपिटमध्ये परिस्थिती हाताबाहेर गेली आहे, हे मात्र कळायला हवे. आता त्यासाठीच कॉकपिटला काही पारदर्शक काच वगैरे असावी का, यावरही कदाचित विचार होईल. वैमानिक, क्रू यांचे बॅकग्राउंड चेक अधिक काटेकोर करावे लागतील.

जगभरात अनेक कंपन्यांना वैमानिकांची चणचण भासत असते; त्यामुळेच वेगवेगळ्या देशांचे वैमानिक वेगवेगळ्या देशांतील विमान कंपन्यांची विमाने उडवतात. सध्या सुरू असलेले भूराजकीय संघर्ष व विविध देशांमधली साठमारी पाहता कुणाच्या मनात एखाद्या देशाविरुद्ध राग कधी उफाळून येईल, हे सांगणेही कठीण असते. त्यासाठी केलेल्या सुरक्षानिर्बंधांचा परिणाम विमान परिचालनावर किंवा वैमानिकभरतीवरही व्हायला नको. कामातील ताणतणाव, आर्थिक अस्थैर्य या वैयक्तिक बाबींचाही परिणाम कामावर व्हायला नको. त्यासाठी वैमानिक, केबिन क्रू यांचे प्रत्येक उड्डाणापूर्वी मानसिक संतुलन तपासणेही कठीण आहे. विमानांसाठी कॉकपिट आणि विमानाच्या केबिनचे मानसिक स्थैर्य महत्त्वाचे आहे व त्याच धर्तीवर इतर वाहनांसाठीही आता सुरक्षा यंत्रणांना हाच विचार करावा लागेल.

– समीर कर्वे

# नवरात्री उत्सवामागील शास्त्र आणि वास्तव !

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणार्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणून पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. देवीने ९ दिवस महिषासुराशी युद्ध करून दहाव्या दिवशी त्याचा वध केला याचे प्रतीक म्हणून गुजरातमध्ये दांडिया खेळला जातो. दांडिया म्हणजे देवीच्या हातातील शस्त्र असून पूर्वी युद्धाच्या अविर्भावात तो खेळला जात असे. कालांतराने त्याला आता नृत्याचे स्वरूप आले आहे. महाराष्ट्रापासून गुजरात जवळच असल्याने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातही नवरात्री हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला आहे. त्यानिमित्ताने इथेही रासगरबा आणि दांडिया खेळला जाऊ लागला आहे. हिंदूंच्या धार्मिक उत्सवांचे बाजारीकरण होऊ लागले आहे त्यापासून नवरात्री उत्सवही मागे राहिलेला नाही. नवरात्री उत्सवाचे मुंबईसारख्या शहरांत इव्हेन्ट होऊ लागले आहेत. धनाढ्य उद्योगपती, राजकारणी मोठी मैदाने आरक्षित करून याठिकाणी नऊ दिवस गरब्याचे कार्यक्रम आयोजित करतात. या इव्हेंटमध्ये मोठ्मोठे वाद्यवृंद, गायक आणि सिनेसृष्टीतील कलाकारांना बोलावून लोकांना आकर्षित केले जाते. स्पर्धांचे आयोजन करून प्रतिदिन उत्कृष्ट नृत्य आणि वेशभूषा करणाऱ्यांना बक्षिसे दिली जातात. गरब्यात सहभागी होणाऱ्यांसाठी शेकडो रुपयांची प्रवेश फी आकारली जाते. श्रीमंतांची मुले या कार्यक्रमांत हिरीरीने सहभागी होतात.

नवरात्र हा खरेतर देवीच्या उपासनेचा उत्सव मात्र हल्ली जसे दहीहंडी उत्सवांत दहीहंडी नावाला आणि केवळ मानवी मनोऱ्यांचीच स्पर्धा पाहायला मिळते त्याप्रमाणे नवरात्री उत्सवांत देवीची उपासना नगण्य आणि तरुणांची मौजमजाच अधिक पाहायला मिळते आहे. गेल्या काही वर्षांत नऊ रात्रीच्या नऊ दिवसांत वेगवेगळ्या रंगाचे वेष परिधान करण्याचा ट्रेंड फोफावला आहे ज्याला धर्मशास्त्राचाच नव्हे तर तर्कशास्त्राचाही आधार नाही. तरीही स्त्रीवर्ग यासाठी आधीच सज्ज होतो. यंदाच्या नऊ दिवसांचे नऊ रंग कोणते हे एकदा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले कि त्या रंगांचे कपडे आपल्याकडे सुस्थितीत आहेत का हे पाहिले जाते. नसतील तर ते खरेदी केले जातात. नऊ दिवस वेगवेगळ्या रंगांचे कपडे परिधान करायचे म्हणजे त्या रंगाला अनुसरून कानातले, गळ्यातले, नाकातले दागिनेही मॅचिंग असायला हवेत, केशभूषाही



त्यानुरूप असायला हवी, मग त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. स्त्री वर्गासह आता पुरुष वर्गही काही प्रमाणात या रंगसंगतीत सहभागी होऊ लागला आहे. नवरात्रीच्या निमित्ताने गरब्यात नृत्य करायला जायचे म्हणून अनेक तरुण तरुणी नवरात्रीच्या एक महिना आधीपासूनच नृत्याचे वर्ग लावून घेतात, अर्थात नवरात्रीच्या निमित्ताने विशेष नृत्य शिकवणारे नृत्याचे वर्गही या दिवसांत मोठ्या प्रमाणात उदयास येतात. नृत्य करताना परिधान करण्यासाठी विशेष प्रकारचे पोषाखही खरेदी केले जातात. हे पोशाख विकणारेही या दिवसांत फॉर्मात असतात. हा सर्व प्रकार पूर्वी केवळ श्रीमंत वर्गात पाहायला मिळत असे; मात्र गेल्या काही वर्षांत यामध्ये मध्यमवर्गीय तरुण तरुणीही सहभागी होऊ लागले आहेत.

देवीच्या उत्सवाचे जसे बाजारीकरण होऊ लागले, तशा काही विकृतींचाही शिरकाव या उत्सवात होऊ लागला आहे. विषेषतः स्त्रीवर्ग या विकृतीला बळी पडू लागला आहे. रात्री गरबा खेळायला जाताना विविध प्रकारचे टॅटू अंगावर काढून घेऊन मिरवण्याचा ट्रेंड फोफावत चालला आहे. बॅकलेस ब्लाउज घालून उघड्या पाठीवर, किंवा उघड्या दंडावर विविध टॅटू काढून घेतले जातात. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. काही ठिकाणी तर टॅटू काढणाऱ्यांचा धंदा तेजीत चालावा या हेतूने टॅटूच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यांच्या अंगावरील टॅटू अधिक आकर्षक त्यांना बक्षीस दिले जाते. अशा प्रकारे शरीराचा भाग उघडा ठेऊन त्यावर टॅटू काढून मिरवण्यात कसली आली आहे भक्ती ? हे असले प्रकार देवीला तरी आवडणार आहेत का ? नवरात्रीमध्ये सार्वजनिक ठिकाणी गरबा खेळण्यास वेळेचे बंधन असले, तरी अनेक ठिकाणी हे नियम धाब्यावर बसवून रात्री उशिरापर्यंत गरबा खेळला जातो. त्यानिमित्ताने तरुण तरुणी रात्री उशिरापर्यंत घराबाहेर असतात. नवरात्री काळात संतती नियमनाच्या साधनांची नेहमीच्या तुलनेत दुप्पट विक्री होते तसेच यानंतरच्या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या गर्भपाताच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते असेही एका सर्वेक्षणातून निदर्शनात आले आहे. देवीच्या उत्सवाआडून काही विकृत मनोवृत्ती भोगवादाला खतपाणी घालत आहेत हेच यातून दिसून येते. गतवर्षीप्रमाणे यंदाही काही हिंदुत्ववादी संघटनांनी गरब्याच्या कार्यक्रमांत येणाऱ्यांचे ओळखपत्र बघून केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा असे आवाहन केले होते. या आवाहनाला अनेक हिंदूंनीच विरोध केला याचे आश्चर्य वाटते. भारतातील वाढता लव्ह जिहाद सरकारचीही डोकेदुखी बनली आहे. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या लव्ह जिहादवर निर्बंध आणण्यासाठी काही राज्यांत याविषयी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारही हा कायदा करण्यास अनुकूल आहे. नवरात्रीच्या काळात धर्मांध प्रवृत्ती गरब्याच्या कार्यक्रमांत शिरतात आणि हिंदू मुलींना लक्ष्य करतात, त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. दरवर्षी अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. त्यामुळेच यंदा हे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला खरेतर सर्वच स्तरांतून प्रतिसाद मिळायला हवा. पूर्वी 'गरबा' या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतरचित गीतेच म्हटली जात असत. हल्ली मात्र भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर विचित्र अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. डॉल्बी, डीजेसारखे कानठळ्या बसवणारे संगीत लावले जाते. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. नृत्य करताना अनेक ठिकाणी महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात, यातून मारामाऱ्या होतात. एकूणच यातून उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला राहतो.

वर उल्लेख केल्याप्रमाणे नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे. हे नऊ दिवस देवीने महिषासुराशी युद्ध केले. दांडिया खेळणे म्हणजे देवीच्या मारक रूपाची उपासनाच आहे. यातून खासकरून महिलांनी बोध घ्यायला हवा. देवीने या नऊ दिवसांत प्रकट रूप धारण करून तमप्रवृत्तीचा म्हणजे महिषासुराचा नाश केला. स्त्रीमध्ये किती पराकोटीची शक्ती आणि सामर्थ्य आहे हेच यातून देवीने दाखवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी नवरात्रीत केवळ नृत्याला आणि रंगसंगतीच्या पोशाखाला उपासना न मानता देवीच्या मारक रूपातून बोध घेऊन त्याच्या उपासनेला प्राधान्य द्यायला हवे. आजमितीला स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. कोणतेही क्षेत्र स्त्रीसाठी सुरक्षित राहिलेले नाही. सुरक्षा यंत्रणा किंवा नातेवाईक प्रत्येक वेळेस आपल्या मदतीला धावून येतीलच असे नाही यासाठी आपणच आपले संरक्षण करण्यास आणि दुष्ट प्रवृत्तीचा विरोध करण्यास सिद्ध व्हायला हवे. राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर, कित्तूरची राणी चेन्नमा अशा एकनाअनेक कितीतरी शक्ती उपासक पराक्रमी स्त्रिया या मातीत होऊन गेल्या. आजच्या स्त्रियांना त्यांचाचआदर्श घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

हिंदू धर्मातील सण उत्सव यांमध्ये भगवंताची भक्ती आणि उपासना यांना प्राधान्य असायला हवे; मात्र त्यांचे निमित्त साधून चंगळवादाला आणि भोगवादाला खतपाणी दिले जात असेल तर ते कुठेतरी थांबायला हवे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### मदत सवय

कितीदा मदत घेऊ
लागे विचित्र सवय
वाटूनये कुणा असे
आम्हांएकट्याहवयं

आत्मनिर्भरता गळे
मनोमन वाटते भय
ओझे आत्म्यांवरती
कसेबनायचे निर्भय

दिलदार आहा भले
केवढे दानशूर हृदय
झोळीहातात देऊन
नकात बनू रे निर्दय

असे घाम गाळणारे
तुटून जाय सर्व लय
आदत पडेसंकटाची
अनेकसोसले प्रलय

उपास मारीत सुध्दा
सुखात हसे आलय
आवरावी दानशूरता
नको मदतीचे वलय

दणकट केले आम्हां
आपत्तीची नको गय
लढाई जीवंत ठेविते
कसलीकशी हयगय

मैत्री करी संकटाशी
सहजसाधे समन्वय
पायावर स्वतासावरे
लांबसारुन अनन्वय

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# हिंदू विवाहसंस्थेचा उद्देश गोरेपण, देखणेपण नव्हे, तर सुसंस्कृत तेजस्वी पिढीचे निर्माण

### वाचक पत्र

आज विवाह ठरवताना 'मुलगा-मुलगी गोरीपान, उंच, देखणे अन् सुंदर असावी' एवढाच संकुचित विचार केला जातो. हा एवढाच हिंदू विवाह संस्थेचा उद्देश कधीच नव्हता.

आजची आधुनिक शिक्षणप्रणाली आणि पाश्चात्त्यांचे अंधानुकरण यांमुळे जन्महिंदूंवर धर्मशिक्षणाचे संस्कारच झालेले नाहीत. त्यामुळे ईश्वराला अपेक्षित असे संस्कारच समाजावर होत नाहीत.

ब्राह्मतेज, क्षात्रतेज, वैश्यतेज आणि शूद्रतेज म्हणजे काय, हेच आम्हाला कळलेले नाही. त्यासाठी कोणत्या दुर्गुणांचा त्याग करावा आणि कोणते सद्गुण अंगीकारावेत, यासाठी अंतिम उपाय एकच आहे – साधना.

चांगल्या गुरुंच्या मार्गदर्शनाखाली स्वतः साधना करणे, परिवाराने साधना करणे आणि संपूर्ण हिंदू समाजाने साधना करणे, हेच हिंदू धर्म-संस्कृती आणि नीतिमूल्ये टिकवण्यासाठी आवश्यक आहे.

प्रत्येक जन्महिंदूने आत्मपरीक्षण केले पाहिजे – माझा जन्म कुठे झाला आहे, हे महत्त्वाचे नाही, तर मी हिंदू धर्मानुसार साधना करतो आहे का ? माझे आचार-विचार सात्त्विक आहेत का ?

शारीरिक सौंदर्य आणि केवळ गोरेपान असणे हा हिंदू विवाहाचा उद्देश नाही. पोटी जन्माला येणारे मूल दिसायला सुंदर असण्यापेक्षा संस्कारवान असणे महत्त्वाचे आहे. जर एखादा विद्वान घराण्यात जन्म घेऊनही देव-धर्माची खिल्ली उडवत असेल, तर तो ब्राह्मण या संज्ञेला पात्र ठरत नाही.

म्हणूनच सर्वच बाजूंनी ढासळलेली समाज-व्यवस्था उन्नत करण्यासाठी आपल्या पोटी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, मुक्ताई, छत्रपती शिवाजी महाराज यांसारखी आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत आणि दैवी बालके जन्माला यावीत, यासाठी विवाह करताना यापुढील काळात जात हा निकष न पाहता 'आध्यात्मिक परिपक्वता' हा निकष पाहिला जाणे आवश्यक बनले आहे, म्हणजे जोडीदार साधना करतो का, हे पाहणे हाच सुसंस्कृत (आर्य) पिढी निर्माण करण्याचा धर्मशास्त्राचा मूळ उद्देश आहे. गाढवांसमोर वाचली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता अशी स्थिती येता कामा नये. कुंतीपूत्र अर्जूनासम भगवंताचे आज्ञापालन करून धर्मयुद्ध जिंकणारी पिढी घडवणे. 'कृण्वंतो विश्वम् आर्यम्' म्हणजे संपूर्ण विश्वाला आर्य (सुसंस्कृत) करू ही वेदांची शिकवण सार्थ ठरवणे यासाठी सर्वांनी साधना करूया !

**– भूषण वाळणुसकर, डोंबिवली**

# पूर्वजांची स्मृती जागृत ठेवणारी 'सर्वपित्री अमावस्या'

गेलेली व्यक्ती आणि वेळ कधीच परत येत नाही. कोणाचे आभार मानायचे राहून जातात, तर कोणाची माफी. बरेच काही बोलायचे, सांगायचे राहून जाते. अशा आपल्यातून निघून गेलेल्या आप्त-स्वकीयांशी, संवाद साधण्याचा, ऋणनिर्देश करण्याचा आणि मनात दाटलेल्या भावनांना वाट मोकळी करून देण्याचा काळ म्हणजे पितृपंधरवडा आणि त्याचाच समाप्तीचा दिवस 'सर्वपित्री अमावस्या.' यंदा १० ऑक्टोबर रोजी सर्वपित्री आमावस्या आहे ज्या पितरांची तिथी माहीत नसते, अशा सर्व पितरांचा शाद्ध विधी सर्वपित्री अमावस्येला केला जातो.आपण स्वत:ला स्वयंभू समजत असलो, तरी तो आपला भ्रम आहे. आपल्या जडण-



घडणीत अनेक लोकांचा हात असतो. साधा प्रवास करत असताना, आपल्याकडे जरी मर्सडिज असली, तरी प्रवासाचा रस्ता खाचखळग्यांनी भरलेला असेल, तर प्रवासाचा आनंद घेता येत नाही. पण तोच, जर एखादा रस्ता गुळगुळीत असेल, तर प्रवासाचा आनंद द्विगुणित होतो. त्याचप्रमाणे आपल्या आयुष्याची गाडी भरधाव वेगाने जावी, यासाठी आपल्या पूर्वजांनी तो मार्ग सुकर करून ठेवला आहे. मग या प्रवासात त्यांची आठवण ठेवून, त्यांचे आभार तर मानले पाहिजेतच ना ? म्हणून तर वाहनांच्या मागे आई-वडीलांची पुण्याई', दादांचा आशीर्वाद', ऋआजीची माया' वगैरे संदेश लिहिलेले नजरेस पडतात. पूर्वजांची स्मृती जागृत ठेवून त्यांना आदरांजली वाहण्यासाठी धर्मशास्त्राने पितृपंधरवड्याचा काळ निश्चित केला आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात बातम्या

## खा. प्रतिभा धानोरकर यांची कोळसा, खाणी आणि पोलाद उद्योग लोकसभा स्थायी समितीवर पुनर्नियुक्ती



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** चंद्रपूर-वणी- आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांची केंद्र सरकारने २०२६-२७ साठी 'कोळसा, खाणी आणि पोलाद उद्योग' या विषयक संसदीय स्थायी समितीवर पुनर्नियुक्ती केली आहे. लोकसभा सचिवालयाने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रकानुसार, लोकसभा बुलेटीन भाग-२ (परिच्छेद क्र. ६१८७) द्वारे या नियुक्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. ही नियुक्ती २६ सप्टेंबर २०२६ पासून अंमलात आली असून, या समितीच्या अध्यक्षपदी खासदार अनुराग सिंह ठाकूर यांची नियुक्ती लोकसभा अध्यक्षांकडून करण्यात आली आहे. चंद्रपूर व परिसरातील कोळसा, खाण आणि खनिज क्षेत्राशी संबंधित महत्वाचे प्रश्न, कामगारांचे हित, पर्यावरण संतुलन आणि स्थानिक उद्योगांचा विकास यावर खा. प्रतिभा धानोरकर या समितीच्या माध्यमातून संसदेत प्रभावीपणे आवाज उठवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## नवीन बिना बौद्ध विहारात धम्मदेसना



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात वर्षावास कार्यक्रमांतर्गत धम्मदेसनेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला कार्यक्रमाचे उद्घाटक तुळशीराम बागडे, सदस्य सल्लागार समिती यांच्याहस्ते माल्यार्पण करून व बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य वक्ता, मार्गदर्शक व प्रशिक्षक वंदनीय भदंत सोमानंद, राष्ट्रीय प्रभारी बुद्धिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क भिक्खू संघ यांनी सम्यक जीवन जगण्यासाठी काया, वाचा व मनावर नियंत्रण ठेवून बुद्धांचा निर्वाण मार्ग मिळतो, धम्माशोक कळतो आणि आंबेडकरवादी विचारांचा गड आपण चढतो असे धम्मदेसनेतून विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मोरेश्वर लाडे, सदस्य बहुजन मुक्ति मोर्चा यांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय व सर्वजण सुखाय हाच मार्ग सर्वोत्तम आहे, असे संगितले.

कार्यक्रम व भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष प्रा. डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी धम्म बळकट करण्यासाठी संघ बळकट करण्याची आवश्यकता असून त्यासाठी तथागत बुद्धांच्या आर्य अष्टांगिक मार्गावर मार्गक्रमण करण्याची अपील केली. कार्यक्रमाची सांगता ध्यान साधना घेवून करण्यात आली. याप्रसंगी आयोजक भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ तसेच भारतीय बौद्ध महासभा शाखा, भानेगाव व खापरखेडा यांचे पदाधिकारी, सदस्य आणि परिसरातील उपासक, उपसिका व नागरिक धम्मदेसनेत सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिना नरेश ढोकेयांनी तर सूत्र संचालन कोषाध्यक्ष रविंद्र ढोके तर आभार अरुण नारनवरे यांनी व्यक्त केले.

## निफाडच्या महसूल लोक अदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद २८ प्रलंबित प्रकरणांचा संवादातून निपटारा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र शासनाचा महसूल व वनविभाग तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या निर्देशानुसार निफाड येथे आयोजित 'महात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियानात' वादी-प्रतिवादींमध्ये समुपदेशन घडवून आणत २८ प्रलंबित प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यात आला. निफाडचे प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय येथे हे अभियान पार पडले.

महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे जलदगतीने आणि परस्पर संमतीने निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. या लोक अदालतीसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडील १८१ प्रकरणे, तर तहसील कार्यालयाकडील 'मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६' चे कलम ५ व 'महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६' चे कलम १४३ अन्वये दाखल असलेली १०४ वहिवाट प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती.

पक्षकारांशी थेट संवाद साधण्यासाठी चार स्वतंत्र टेबलांची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडील २४ तर तहसील कार्यालयाकडील ४ अशा एकूण २८ प्रकरणांमध्ये यशस्वी तडजोड घडवून आणण्यात आली. संबंधित वादी, प्रतिवादी व विधिज्ञांच्या स्वाक्षऱ्या घेऊन समेटाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली, तर उर्वरित प्रकरणांसाठी पुढील तारखा देण्यात आल्या.

या अभियानासाठी महसूल सहायक शरद घाटगे, मंडळ अधिकारी जयंत लिलके, उल्हास टर्ले, गोविंद काळे, अश्विनी भोसले, तसेच महसूल सहायक ललित खैरे, गणेश कुमावत, नितीन भोई व अंबादास पिठे यांनी कामकाज पाहिले. या वेळी निफाड बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण ठाकरे यांच्यासह स्थानिक विधिज्ञांचे विशेष सहकार्य लाभले.

● महसुली प्रकरणांमुळे पक्षकारांचा वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा मोठ्या प्रमाणात खर्च होते. परस्पर संवाद आणि समुपदेशनातून वाद मिटल्यास दोन्ही बाजूंचा वेळ वाचतो आणि कटुता संपते. महसूल लोक अदालत हे नागरिकांना जलद, सुलभ आणि सामोपचाराचा मार्ग उपलब्ध करून देणारे अत्यंत प्रभावी व्यासपीठ आहे.

**– डॉ. शशिकांत मंगरुळे (प्रांताधिकारी, निफाड)**

● पक्षकारांनी वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी पुढाकार घेतल्यास प्रकरणांचा निपटारा वेगाने होतो. लोक अदालतीमुळे नागरिकांना कार्यालयीन व न्यायालयीन फेऱ्यांमधून कायमचा दिलासा मिळतो.

**– विशाल नाईकवाडे (तहसीलदार, निफाड)**

## शाळकरी विद्यार्थ्यावर सिरिंज सदृश वस्तूने हल्ला - नगरसेविका सई शिर्के यांनी घेतली रुग्णालयात भेट

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०६, घाटकोपर :** प्रभाग क्रमांक १२८ येथील शाखेच्या मागील परिसरात राहणारा आणि इयत्ता ७ वी मध्ये शिकणारा विद्यार्थी यश चौरसिया याच्यावर शिरीषकुमार पै. द्यानाजवळ त्याच्याच वयोगटातील काही मुलांनी सिरिंज सदृश वस्तूने हल्ला केल्याची अत्यंत गंभीर घटना घडली आहे.

या हल्ल्यानंतर यश बेशुद्ध पडला होता. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत तात्काळ त्याला जवळच्या संत मुक्ताबाई महानगरपालिका रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी तात्काळ तपासणी करून त्याच्यावर आवश्यक उपचार केले असून, सध्या त्याची प्रकृती स्थिर असून तो धोक्याबाहेर आहे.

**नगरसेविका सई शिर्के यांची रुग्णालयात भेट**

### प्रभागातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर...

घटनेची माहिती मिळताच मनसे नगरसेविका तथा स्थापत्य समिती सदस्या सई शिर्के यांनी संत मुक्ताबाई रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देऊन यशची आणि त्याच्या कुटुंबीयांची विचारपूस केली. यावेळी त्यांनी डॉक्टरांकडून त्याच्या प्रकृतीबाबत सविस्तर माहिती घेतली.

यावेळी बोलताना सई शिर्के म्हणाल्या, ही घटना केवळ एका विद्यार्थ्यावर झालेला हल्ला नसून आपल्या संपूर्ण परिसरातील मुलांच्या सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत गंभीर बाब आहे.अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.



**पोलिसांकडे ठाम मागणी**

या प्रकरणी मुंबई पोलीस व संबंधित प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी सई शिर्के यांनी केली आहे. तसेच पालकांनीही आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि कोणतीही संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास त्वरित १०० नंबरवर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मुलांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.अशा घटनांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## आळंदीत इंदिरा एकादशी दिनी भाविकांची दर्शनास गर्दी

### श्रींचे गाभाऱ्यात पुष्प सजावट लक्षवेधी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, आळंदी (पुणे) :** येथील इंदिरा एकादशी दिनी माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात इंदिरा एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली.

लाखावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी मंदिर आणि नगरप्रदक्षिणा करीत भाविकांनी हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. आळंदी ग्रामस्थ व महिला भाविकांची इंद्रायणी आरतीस मोठी गर्दी झाली होती.

आळंदी मंदिरात भाविकांनी एकादशीस गर्दी करीत श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आल्याचे आळंदी देवस्थांनचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले.

भाविकांना श्रींचे मंदिर दर्शनास कमी वेळेत जास्त भाविकांना दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी मंदिर परिसरात रांगा लावून दर्शन घेतले. दुपारचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने परंपरेने प्रवचन, कीर्तन, रात्री धुपारती, शेजारती, हरिजागर झाला. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस देखील गर्दी केली. मंदिरात परंपरेने धार्मिक उपचार श्रीची पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आदी धार्मिक कार्यक्रम झाले. भाविकांची कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शनास सुलभ व्यवस्था व्यवस्थापक माऊली वीर यांचे नियंत्रणात करण्यात आली. यावेळी सुरक्षा रक्षक, सेवक आणि मंदिरातील बंदोबस्ता वरील पोलिसांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पोलीस नाईक मछिंद्र शेंडे आदींनी बंदोबस्ताचे सुरळीत, सुरक्षिततेसाठी नियोजन केले.

आळंदीतील रहदारीची वर्दळ पाहता येथे वाहतुकीचे केलेले प्रभावी नियोजन यामुळे भाविक, नागरिक यांना वाहतुकीचे कोंडीतून राहत मिळाली. आळंदी पोलिसांनी रस्त्यावरील बेकायदेशीर पार्किंग केलेल्या गाडयांवर प्रभावी कारवाई केली. यामुळे आळंदीत नागरिक, व्यापारी, पोलीस मित्र यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी इंद्रायणी आरती सेवा समितीच्या प्रमुख संयोजक अनिताताई झुजम निलम कुरधोंडकर, अनिता शिंदे, सुवर्णाताई काळे, रेखा चव्हाण, सरस्वती भागवत, कौताबाई देवकर, सावित्री घुंडरे, शोभा उबाळे, सुमनबाई सोनवणे, उषा वर्तले, ओम वर्तले ज्योती यादव, सुरेखा काळभोर, राजेंद्र जाधव, दत्ताराव तोतरे, संयोजक इंद्रायणी आरती सेवा समिती अर्जुन मेदनकर, ज्ञानेश्वर घुंडरे, गोविंद सुरेश तौर, तारामती गोरेउषाताई देसले, ज्योती यादव, पुष्पाताई भगवान लेंडकर, दिनकर तांबे, उषाताई वहिले आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपस्थित पाच महिला मान्यवरांचे हस्ते इंद्रायणी नदीचे पूजन औक्षण करून करण्यात आले. दर एकादशी दिनी इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी आरती, स्वच्छता, रांगोळी, प्रसाद वाटप होवून पसायदानाने सांगता होते. या उपक्रमात सर्व भाविक, नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक अर्जुन मेदनकर, संयोजिका अनिताताई झुजम यांनी केले आहे.

## १०० पासून थेट १,००० पर्यंत पैशांचे डाव; पानटपरी, हॉटेल अन् सार्वजनिक ठिकाणी कथित जुगाराचा आरोप

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०६, जिंतूर :** मोबाईलवर मनोरंजनासाठी खेळला जाणारा लुडो गेम आता काही ठिकाणी पैशांच्या जुगाराचा आडोसा बनत असल्याचा आरोप होत आहे. ग्रामीण भागातील गावांपासून शहरी भागातील पानटपऱ्या, चहाच्या हॉटेल्स आणि इतर ठिकाणी लुडोच्या नावाखाली पैशांचे डाव लावले जात असल्याचे आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

**गेम लुडोचा... पण डाव पैशांचा!**

काही ठिकाणी ₹१००, ₹२००, ₹५०० तर थेट ₹१,००० पर्यंत रकमेचे डाव लावले जात असल्याचा आरोप आहे. सुरुवातीला मनोरंजन म्हणून सुरू होणारा खेळ पुढे पैशांच्या व्यवहारात बदलत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.विशेष म्हणजे हा प्रकार एखाद्या एकाच ठिकाणी मर्यादित नसून ग्रामीण भागापासून शहरातील विविध भागांमध्ये सुरू असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे लुडोच्या नावाखाली नेमका काय खेळ सुरू आहे? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

**पानटपरी, हॉटेल बनले 'गेम पॉइंट'?**

पानटपरीवर चहा-पानासाठी येणारे काही जण डींवे खेळताना दिसतात. मात्र या खेळात पैसे लावले जात असल्याचा



आरोप असल्याने संबंधित ठिकाणे केवळ मनोरंजनाची ठिकाणे राहिली आहेत की पैशांच्या डावाचे अड्डे बनत आहेत, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे.लुडो खेळा, पण पैसे लावू नका असा साधा नियम पाळला जात नसल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**१०० पासून सुरुवात; हजारावर डाव?**

स्थानिकांच्या आरोपानुसार, काही ठिकाणी कमी रकमेपासून पैशांचा खेळ सुरू होतो. ₹१०० किंवा ₹२०० पासून सुरू झालेला डाव पुढे ₹५०० आणि ₹१,००० पर्यंत जात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबातील तरुण या प्रकारात पैसे गमावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**तरुणाईच्या हातात मोबाईल अन् पैशांचा डाव!**

मोबाईल गेमिंगचे आकर्षण आधीच वाढलेले असताना त्याच खेळाला पैशांची जोड मिळाल्यास तरुणांमध्ये आर्थिक नुकसानाची शक्यता वाढू शकते. आज काही रुपये, उद्या शेकडो आणि पुढे हजारो रुपयांचा डाव अशी सवय लागण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

**प्रशासन झोपेत की कारवाईची प्रतीक्षा?**

जर नागरिकांकडून करण्यात येणारे आरोप खरे असतील आणि डींवेच्या माध्यमातून प्रत्यक्ष पैशांवर डाव लावला जात असेल, तर संबंधित यंत्रणांनी याची तातडीने दखल घेण्याची गरज आहे.पानटपऱ्या, हॉटेल्स व सार्वजनिक ठिकाणी अचानक तपासणी करून लुडोच्या नावाखाली पैशांचा खेळ सुरू आहे का, याची वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**लुडोच्या आडचा 'खेळ' उघड होणार का?**

लुडो खेळणे हा स्वतःमध्ये गुन्हा नाही; मात्र त्याचा वापर पैशांवर डाव लावण्यासाठी होत असेल तर संबंधित कायदेशीर बाबींची तपासणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे या आरोपांची पोलिस प्रशासनाकडून चौकशी होऊन सत्य जनतेसमोर येणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. गेम लुडोचा असला तरी प्रश्न पैशांचा आहे. ₹१०० पासून सुरू होणारा डाव ₹१,००० पर्यंत पोहोचत असल्याचे आरोप होत असताना, प्रशासनाने डोळेझाक न करता प्रत्यक्ष परिस्थिती तपासण्याची गरज आहे.

# नगावला दुष्काळग्रस्त शेतकर्यांशी संवाद; महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडून दिलासा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०६, शिरपूर (धुळे) :** धुळे ग्रामीण मतदारसंघातील दुष्काळजन्य परिस्थिती, शेती पिके आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांची प्रत्यक्ष पाहणी करत असताना राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नगाव येथील मध्यवर्ती कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी जिल्हा परिषदेचे आजी-माजी सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच-उपसरपंच, ज्येष्ठ पदाधिकारी तसेच नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व प्रभु श्रीराम आणि श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र पाटील यांनी स्नेहपूर्वक सन्मान केला. तसेच पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि स्थानिक विकासकामांबाबत सकारात्मक व सविस्तर चर्चा करण्यात आली.



या प्रसंगी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री आदरणीय जयकुमारभाऊ रावल, खासदार स्मिताताई वाघ, माजी खासदार डॉ. सुभाष भामरे, आमदार अमरीशभाई पटेल, रावेर यावल विधानसभा मतदासंघाचे आमदार अमोल जावळे, अमोल शिंदे, लातूरचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजप नंदुरबार जिल्हा प्रभारी बबन चौधरी, धुळे शहराचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र शेठ अंपळकर, भाजपा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, भाजप संघटन सरचिटणीस भाऊसाहेब देसले, भाजप धुळे जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, मुंबई कृषीबाजार समिती संचालक रावसाहेब गिरासे शिवसेना उपनेत्या शुभांगीताई पाटील, मा.जि.प.सदस्य आशुतोष पाटील, मा.शिक्षण व आरोग्य सभापती पंकज भाऊ कदम, मुकटीचे मा.उपसरपंच रोहिदास पहेलवान, तसेच यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आपला अमूल्य वेळ काढून आमच्या नगाव येथील कार्यालयाला भेट देऊन मार्गदर्शन केल्याबद्दल सर्व आदरणीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र पाटील यांनी मानले.

# प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे येथे जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह उत्साहात संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** 'अनुभवलेल्या व्यथा ऐकू या : खरे आवाज, खरा बदल' या २०२६ च्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथे विविध जनजागृतीपर उपक्रमांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

मानसिक आजारांचा प्रत्यक्ष सामना केलेल्या व्यक्तींचा संघर्ष, पुनर्वसन आणि त्यांचे अनुभव समाजाने संवेदनशीलतेने समजून घ्यावेत, तसेच त्यांच्या आवाजाला आरोग्य सेवांच्या केंद्रस्थानी स्थान मिळावे, या मुख्य उद्देशाने हा सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला.

सप्ताहाच्या निमित्ताने रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात (OPD) एक विशेष पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये मानसिक आजारांशी निगडित गैरसमज दूर करणे, वेळेवर उपचारांचे महत्त्व, पुनर्वसनाचा मार्ग आणि समाजात अशा व्यक्तींचा स्वीकार याविषयी मार्गदर्शन करणारी संदेशपर पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आली. रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि नागरिकांकडून या प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद मिळाला.

दुसरीकडे, व्यवसायोपचार विभागात (Occupational Therapy Department) योग्य उपचारांच्या बळावर मानसिक आजारातून पूर्णपणे सावरून आत्मविश्वासाने जीवन जगणाऱ्या रुग्णांच्या प्रेरणादायी प्रवासावर आधारित चित्रफिती दाखवण्यात आल्या. याप्रसंगी अशा यशोगाथा घडवणाऱ्या रुग्णांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा विशेष गौरव करण्यात आला.

मानसिक आजारातून सावरणे पूर्णपणे शक्य असून पुन्हा आनंदी व नियमित आयुष्य जगता येते, असा दृढ विश्वास या उपक्रमातून व्यक्त झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ठाणे उपसंचालक डॉ. कैलास पवार यांनी भूषवले. त्यांच्या शुभहस्ते जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या मुख्य थीमचे अनावरण करण्यात आले. ठाणे, पालघर आणि रायगड या तिन्ही जिल्ह्यांमध्ये आरोग्य विभागामार्फत मानसिक आरोग्यासाठी सातत्याने जनजागृती शिबिरे, ओपीडी




सेवा आणि रॅलीजचे आयोजन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे हे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे सेवा केंद्र असून भविष्यात या सेवा अधिक व्यापक, सुलभ आणि सक्षम करण्यासाठी शासन तत्पर असल्याचे त्यांनी नमूद केले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांनी रुग्णालयाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. रुग्णांकडे केवळ रुग्ण म्हणून न पाहता कुटुंबातील सदस्याप्रमाणे मायेने, सन्मानाने आणि संवेदनशीलतेने पाहण्याची भूमिका त्यांनी अधोरेखित केली. याच आपुलकीच्या वातावरणामुळे अनेक रुग्ण उपचार पूर्ण करून आत्मविश्वासाने मुख्य प्रवाहात परतत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचा शुभारंभ दंत शल्यचिकित्सक डॉ.अर्चना पवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. मानसिक आरोग्य सेवेत सहानुभूती आणि संवेदनशीलता अत्यंत आवश्यक असून, आरोग्य विभागातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या या कौतुकास्पद भूमिकेचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

'ऐकण्यापासून कृतीकडे' हा मोलाचा संदेश देत, मानसिक आरोग्याविषयी समाजात संवेदनशीलता, स्वीकार आणि पुनर्वसनाची नवी आशा निर्माण करत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# निकणे - पिंपळशेत, वधना पुलांचे अखेर भूमिपूजन

## आमदार राजेंद्र गावित यांच्या पाठपुराव्याला यश; दोन पुलांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०६, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील निकणे-पिंपळशेत तसेच वधना परिसरातील ग्रामस्थांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुलांच्या मागणीला अखेर मूर्त स्वरूप मिळाले आहे. आमदार राजेंद्र गावित यांच्या विशेष प्रयत्नांतून नाबार्डच्या माध्यमातून दोन्ही पुलांच्या कामासाठी निधी मंजूर झाल्यानंतर (दि.०५) सायंकाळी निकणे-पिंपळशेत परिसरातील पुलाच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. त्यामुळे पावसाळ्यात पूरस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या दळणवळणाच्या अडचणी दूर होण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

निकणे-पिंपळशेत पुलासाठी २५०.७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या निधीतून सुमारे ५० मीटर लांबीचा आणि ७.५ मीटर रुंदीचा नवीन पूल उभारण्यात येणार आहे. सध्याच्या पुलापेक्षा हा पूल सुमारे चार फूट उंच असणार आहे. त्यामुळे पावसाळ्यातील पाणीपातळी वाढल्यानंतर ही वाहतुकीसाठी अधिक सुरक्षित मार्ग होणार असून याचबरोबर वधना-निकणे पुलासाठी ३९६.६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा पूल सुमारे ७० मीटर लांबीचा असून, सध्याच्या पुलापेक्षा तब्बल ९ ते १० फूट उंच बांधण्यात येणार आहे. दोन्ही पुलांना जोडण्यासाठी प्रत्येकी ४० मीटर लांबीच्या जोडरस्त्यांचे काम ही करण्यात येणार आहे. निकणे-पिंपळशेत परिसरातील पुलाचा प्रश्न अनेक वर्षांपासून




प्रलंबित होता. ग्रामस्थांनी पुलाच्या मागणीसाठी सातत्याने निवेदने, पत्रव्यवहार आणि संबंधित विभागांकडे पाठपुरावा केला. तसेच वृत्तपत्रांच्या माध्यमातूनही या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. अखेर या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळून पुलाच्या कामासाठी निधी मंजूर झाला आणि सोमवारी भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. भूमिपूजन कार्यक्रमवेळी ठेकेदार श्रेयश विकास पाटील यांनी पुलाचे काम दर्जेदार पद्धतीने करून एक वर्षाच्या आत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आता प्रत्यक्ष बांधकामाला वेग येण्याची अपेक्षा आहे. यावेळी आमदार राजेंद्र गावित यांनी परिसरात होणाऱ्या विकासकामांमुळे भविष्यात जमिनीला महत्त्व प्राप्त होण्याची शक्यता असल्याचे सांगत ग्रामस्थांना जमीन जपून ठेवण्याचे आवाहन केले. जमीन ही भविष्यातील महत्त्वाची संपत्ती असून, केवळ तात्कालिक कारणांसाठी घाईघाईने जमीन विक्री करू नये, असे त्यांनी सांगितले. पावसाळ्यात परिसरातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने निकणे, पिंपळशेत आणि वधना परिसरातील नागरिकांच्या दळणवळणावर परिणाम होत होता. अनेकदा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांसह नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नवीन उंच पूल आणि जोडरस्त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. भूमिपूजन कार्यक्रमात ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख करत पुलाच्या कामाला मंजुरी मिळाल्याबद्दल आमदार राजेंद्र गावित यांचे आभार मानले. पुलाचे काम लवकरात लवकर आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होऊन तो वाहतुकीसाठी खुला व्हावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता नितीन पगारे, मनीष चकधरे, सरपंच सोनाली कोम, उपसरपंच सुदाम मेरे, ठेकेदार आकाश भराडे, सामाजिक कार्यकर्ते सुधीर घाटाळ, दिलीप घोषे, सागर गुप्ता यांच्यासह ग्रामस्थ आणि शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. वर्षानुवर्षांच्या मागणीनंतर अखेर पुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे मंजूर आराखड्यानुसार कामाची गुणवत्ता कायम ठेवत ठेकेदाराने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वर्षभरात दोन्ही पुलांचे काम पूर्ण करून ते वाहतुकीसाठी खुले करावेत, अशी अपेक्षा निकणे-पिंपळशेतसह वधना परिसरातील ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# कर्जत एसटी आगार नफ्यात गतवर्षीच्या तुलनेत उल्लेखनीय कामगिरी

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.०६, कर्जत (रायगड) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील कर्जत आगाराने ऑगस्ट २०२६ मध्ये गतवर्षीच्या ऑगस्ट २०२५च्या तुलनेत नफ्यात येत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. या कामगिरीबद्दल रायगड विभागाचे विभाग नियंत्रक डॉ. सुहास चौरे आणि विभागीय वाहतूक अधिकारी श्री. पाटील साहेब यांनी कर्जत



आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करीत त्याचा सत्कार करण्यात आला.

कर्जत आगाराच्या या यशामध्ये रा.प. कर्मचारी, अधिकारी, चालक, वाहक, चालक तथा वाहक, यांत्रिक कर्मचारी तसेच पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आगाराच्या आर्थिक कामगिरीत सुधारणा होऊन ऑगस्ट महिन्यात नफा मिळविणे शक्य झाले आहे

यावेळी कर्मचाऱ्यांच्या वतीने आगार व्यवस्थापक पृथ्वीराज भूताळे व सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे यांनी अधिकारी वर्गाकडून करण्यात आलेला सत्कार स्वीकारला. कर्जत आगाराच्या या कामगिरीमुळे कर्मचारी वर्गात उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळातही आगाराची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## थोडक्यात बातम्या

### पालिकेच्या शिष्यवृत्तीचे अर्ज कधी भरणार...?

#### ऑक्टोबर महिना चालू झाला तरी ऑनलाइन प्रक्रिया सुरू नसल्याने पालकांमध्ये नाराजी

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०६, जुईनगर (नवी मुंबई) :** दरवर्षी शाळा व महाविद्यालये सुरू झाल्यानंतर जून-जुलै महिन्यात पालिकेच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू केली जाते. मात्र यावर्षी सप्टेंबर महिना संपून ऑक्टोबर महिना चालू झाला तरी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नसल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पालिकेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या गरजू तसेच पात्र विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजनांचा लाभ दिला जातो. त्यामुळे या योजनांचे अर्ज वेळेत उपलब्ध होणे अपेक्षित असते. मात्र शैक्षणिक वर्ष सुरू होऊन अनेक महिने उलटूनही ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा सुरू न झाल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यास विलंब होण्याची शक्यता आहे.

पालिकेत महापौरांची सत्ता आल्यानंतरही विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाबाबतची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नसल्याने पालकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पूर्वीच्या काळात शिष्यवृत्तीचे अर्ज तुलनेने लवकर भरले जात असल्याचे काही पालकांचे म्हणणे आहे.

यासोबतच शाळा-महाविद्यालयांशी थेट संबंध नसलेल्या पालिकेच्या इतर विविध योजनांचे अर्जही अद्याप उपलब्ध नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे. समाज विकास विभागाने तातडीने लक्ष घालून शिष्यवृत्ती तसेच इतर योजनांच्या ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करावी आणि पात्र विद्यार्थी व नागरिकांना वेळेत लाभ मिळेल यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### उपचारासाठी नेलेला ट्रक चालक पोलिसांच्या देखरेखीतून पसार

#### चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रकार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** बिना (संगम) जोड परिसरात कोळशाने भरलेला ट्रक पलटी झाल्यानंतर जखमी चालकाला उपचारासाठी चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन गेलेल्या पोलिसांच्या देखरेखीतून चालक पसार झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. या प्रकारामुळे खापरखेडा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बिना संगम जोड येथे दुपारच्या सुमारास कोळशाने भरलेला ट्रक अनियंत्रित होऊन पलटी झाला. अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र, चालक राजेंद्र रमेश भोस (३०, रा. कामठी) याच्या पायाला दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ट्रक सरळ करण्याची कार्यवाही केली. त्यानंतर जखमी चालकाला पोलिसांच्या वाहनातून चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले अशी चर्चा सुरु होती.आरोग्य केंद्रात नोंदणीची प्रक्रिया सुरू असतानाच चालकाने लघुशंकेसाठी जाण्याची परवानगी मागितल्याचे सांगण्यात येते. याचवेळी त्याने सुरक्षा भिंत ओलांडून तेथून धूम ठोकली. प्रकार लक्षात येताच पोलिसांनी त्याचा पाठलाग केला.

नदीकाठचा परिसर तसेच आजूबाजूच्या शेतशिवारात शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, बातमी लिहेपर्यंत चालकाचा ठावठिकाणा लागला नव्हता.विशेष म्हणजे, पोलिसांच्या म्हणण्यानुसार या अपघातप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नव्हता. चालकाला केवळ उपचारासाठी आरोग्य केंद्रात नेण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांच्या देखरेखीखाली असलेला जखमी चालक सुरक्षा भिंत ओलांडून पसार होईपर्यंत नेमकी खबरदारी काय घेतली जात होती, असा प्रश्न उपस्थित होत आहे. चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून परिसरात शोधमोहीम सुरू होती.

### दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'जलतारा'अंतर्गत जलसंधारण कामांना गती द्या - जिल्हाधिकारी

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०६, नांदेड :** माहूर तालुक्यात पावसाचा खंड लांबल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात यावी. 'जलतारा'अंतर्गत अधिकाधिक कामे हाती घेऊन ती वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी आज माहूर तालुक्यातील लखमापूर ग्राम पंचायतीला भेट देऊन 'जलतारा'अंतर्गत जलसंधारण कामाचे उद्घाटन केले.

यावेळी तहसीलदार अभिजीत जगताप, गटविकास अधिकारी, , तालुका कृषी अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगारसेवक, सरपंच तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.माहूर तालुक्यात पावसाचा खंड लांबल्याने शेतीसह पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि इतर साधनसामग्रीचा योग्य नियोजनातून वापर करून 'जलतारा'अंतर्गत अधिकाधिक कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून ते अडविणे व जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे, यासाठी जलसंधारणाच्या कामांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. गावपातळीवर आवश्यकतेनुसार कामांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.वरिष्ठ प्रशासनाने थेट गावपातळीवर भेट देऊन जलसंधारणाच्या कामांचा आढावा घेतल्याने माहूर तालुक्यातील 'जलतारा' उपक्रमाला गती मिळणार आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपलब्ध पाणीसाठ्याचे संवर्धन आणि पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संधारण करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.